◆ ऑगस्ट १९९९
◆ वर्ष तिसरे
◆ अंक आठवा

मेहता मराठी ग्रंथजगत

– अनुक्रमणिका –

संपादकीय २
मुलाखत– अनिल मेहता ६
साहित्यवार्ता १०
श्रद्धांजली २२
पुस्तक परिचय
- **निसटलेले / आशा बगे** २६
- **काशभट / मंगेश पदकी** ३०
- **लाईफ स्टाइल / सुधीर गाडगीळ** ३३
- **अस्वस्थ दशकाची डायरी / अविनाश धर्माधिकारी** ३८
- **झोंबडं / महादेव मोरे** ४४

फुले आणि काटे ४८
शब्दकोडे ५१
स्पर्धा निकाल ५१

☐ संपादक
सुनील मेहता

☐ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

☐ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

☐ अंकाची किंमत १० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.

☐ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी

☐ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक :* सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.
मांडणी-अक्षरजुळणी : मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

शताब्दीचे महद्भाग्य लाभलेली प्रकाशन संस्था

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य प्रकाशन संस्था 'केशव भिकाजी ढवळे, श्री समर्थ सदन, गिरगाव, मुंबई' शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त महाराष्ट्रात वेगवेगळ्या शहरी या वर्षभरात कार्यक्रम होणार आहेत. इ. स. १९०० मध्ये मुंबईला माधवबागेत देवळाजवळच्या पारावर गणेश चतुर्थीच्या मुहुर्तावर महादेव भिकाजी आणि केशव भिकाजी ढवळे यांनी पुस्तकांचे दुकान सुरू केले. पारावरचे हे दुकान दोन-तीन वर्षात माधवबागेतच एका गाळ्यात चालू राहिले. केशव भिकाजी दुकानात बसून विक्रीव्यवहार बघत आणि त्यांचे दोन भाऊ महादेव व गणेश हे खरेदी व इतर बाहेरची कामे पाहात. त्यामुळे ते भरभराटीला येण्यास वेळ लागला नाही. १९१२ मध्ये महादेव भिकाजी प्लेगने वारले; १९१७ मध्ये केशव भिकाजी यांनी अस्थिक्षयामुळे मुंबई सोडून कार्ल्यातील आरोग्यधाममध्ये जावे लागले. १९१५ मध्ये गणेशपंतांना बाळकृष्ण हा मुलगा झाला. योगायोग असा की त्याच वर्षी केशव भिकाजींच्या सूचनेवरून 'मुलामुलींचे चिमुकले पुस्तक' छापून गणेश भिकाजींनी प्रसिद्ध केले. पुस्तकविक्रीला पुस्तक प्रकाशनाची जोड मिळाली. बाळकृष्ण गणेश ढवळे ऊर्फ सोन्याबापू यांनी कॉलेजशिक्षण जेमतेम वर्षभर करून घरच्या परिस्थितीमुळे अठराव्या वर्षापासून पुस्तक व्यवसायात लक्ष घालण्यास आरंभ केला; १९२७ साली पुस्तकाचे दुकान ठाकुरद्वारला होते. ते पुढे गिरगावात पोर्तुगीज चर्चजवळच्या रामचंद्र बिल्डिंगमध्ये आले. १९३४ मध्ये श्रीसमर्थसदन ही स्वतःची वास्तू बनाम हॉल लेनमध्ये बा. ग. ढवळे यांनी उभी केली. व्यवसायाच्या सोयीने या तीन मजली इमारतीची बांधणी त्यांनी केली. १९३८ साली सोन्याबापूंचे वडील वारले. त्यांच्या एकट्यावरच व्यवसायाची सर्व जबाबदारी पडली.

सोन्याबापूंनी एकापाठोपाठ एक आकर्षक व उपयुक्त पुस्तके प्रकाशित करण्याचा धडाका लावला. पुस्तकांच्या निर्मितीकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. अमेरिकेतील बुकसेलर व पब्लिशर या नियतकालिकाचे नित्य अवलोकन आणि परदेशी पुस्तकांच्या मुद्रण विशेषांचे

चिकित्सक अध्ययन करून त्यांनी आपल्या प्रकाशनाची पुस्तके अधिकाधिक देखणी व सुबक, वाचनसुलभ आणि आशयसंपन्न करण्याचा विडा उचलला. बालवाङ्मय, शालेय वाङ्मय यात त्यांनी विशेष रस घेतला. मुंबई वैभव छापखान्यात त्यांचे छपाईचे काम चाले. त्याकडे लक्ष देऊन उत्तम मुद्रणाची विविध अंगे त्यांनी आत्मसात केली. पुस्तकाच्या मूळ संहितेचे संपादन, निर्दोष हस्तलिखित, पुस्तकाच्या संभाव्य प्रकारानुसार व वाचकवर्गानुसार टाळप वळणाची, आकाराची आणि चित्रांची निवड, कागदाची प्रत, सजावट, मांडणी, बांधणी वगैरे प्रत्येक घटकाकडे ते लक्ष देऊ लागले. धार्मिक वाङ्मयाच्या प्रकाशनातही केशव भिकाजी ढवळे यांचा दबदबा होता. त्याला उत्कृष्ट बालवाङ्मयाची जोड सोन्याबापूंनी दिली. १९४५ मध्ये मंगेशराव कुलकर्णी यांचा कर्नाटक छापखाना आणि कर्नाटक प्रकाशन संस्था विकत घेऊन सोन्याबापूंनी मुख्य कार्यालय चिराबाजारातील कर्नाटक हाऊसमध्ये आणले. दीड हजार पुस्तके त्या वेळी त्यांच्या या दोन्ही संस्थांच्या द्वारे यादीमध्ये आली. तेथील जागाही अपुरी पडल्याने शीवला मोठ्या जागेत त्यांनी छापखान्याचे स्थलांतर केले. मुद्रणयंत्रेही नवी आणली. चौदा छपाईयंत्रे, एक प्रतिरूप मुद्रणयंत्र, ब्लॉकमेकिंग व चित्रण विभागही सुरू केले. मराठीचिये नगरी ही गृहपत्रिका गं. दे. खानोलकर यांच्या संपादनाखाली निघू लागली. फेब्रुवारी १९४८ मध्ये 'खेळगडी' हे मासिक का. रा. पालवणकर यांच्याकडून मालकी हक्काने विकत घेऊन प्रा. वा. ल. कुलकर्णी व भा. रा. भागवत यांच्या संपादकत्वासाठी काढण्यात येऊ लागले. परंतु ही दोन्ही नियतकालिके अल्पावधीतच बंद पडली.

या काळातच रियासतकार सरदेसाई यांचे 'न्यू हिस्टरी ऑफ दि मराठाज' हे त्रिखंडात्मक पुस्तक त्यांनी काढले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स' हे ब्रिटिशांचा रोष झालेले पुस्तक प्रसिद्ध केले.

शीव येथील जागेचा तीन वर्षांचा करार संपल्याने ती जागा सोडणे भाग पडले. त्यामुळे अनेक समस्या उभ्या राहिल्या. तशातच सोन्याबापूंना सायेटिकाच्या आजाराने दीडेक वर्ष फार त्रास दिला. कामगारांनी संप केला. कोर्टकज्जाचीही प्रकरणे उद्भवली आणि सगळेच गाडे विस्कटले. तरीही १९५४ नंतर पुन्हा उमेदीने कामाला सुरुवात केली.

८० पाठ्यपुस्तकांची निर्मिती त्यांनी केली. परंतु त्यांपैकी एकाचीही निवड झाली नाही. जबरदस्त आर्थिक फटका बसला. १९५७ मध्ये ढवळे हे मासिक 'मुलांचे, स्त्रियांचे आणि पुरुषांचे मासिक मनोरंजन करण्यासाठी, सामान्य माणसांचे समाधान साधण्यासाठी' निघाले. परंतु तेही काही दिवसच चालले. ढवळे प्रकाशन संस्थेला मासिक धार्जिणे ठरले नाही. १९५७ साली केशव भिकाजी ढवळे यांचे निधन झाले. त्यामुळे ''आपल्या मागे आयुष्यभर उभ्या असलेल्या एका थोर शक्तिदात्या पुरुषाला आपण गमावून बसलो; आता यापुढे जीवनसंग्राम स्वतःच्याच बळावर विसंबून राहून एकाकी लढावा लागणार आहे, याची

क्षणोक्षणी जाणीव होऊ लागली'' असे सोन्याबापूंना जाणवले.

१९५८ पासून मोठा मुलगा श्रीनिकेतन हाताशी आला. पॉप्युलर प्रकाशनाच्या सहकार्याने नंदी पुस्तके काढण्याचे ठरले. परंतु त्या पुस्तकांना अपेक्षित प्रतिसाद न लाभल्याने १७ पुस्तकेच काय ती निघाली. तशात कर्जफेड न झाल्याने कर्नाटक छापखाना बँक ऑफ महाराष्ट्रने ताब्यात घेतला; काही हितचिंतकांनी रदबदली केल्याने पुन्हा सोन्याबापूंकडे चालवण्यासाठी आला. स्वामी विवेकानंद यांच्या समग्र ग्रंथांची २१ भागातील शताब्दी आवृत्ती त्यांनी काढली. १९६४ च्या दासनवमीला ते निवृत्त झाले. कर्नाटक प्रकाशन संस्था स्वतःकडे ठेवली. ढवळे प्रकाशन संस्था केशव भिकाजी ढवळे यांच्या पत्नी सीताबाई आणि श्रीनिकेतन यांच्या स्वाधीन केली. १९६६ मध्ये कर्नाटक मुद्रणालय आणि १९६८ मध्ये कर्नाटक हाऊसची वास्तू विकून ते बरेचसे कर्जमुक्त झाले. १९६८-७० या काळात ३०-४० पुस्तके त्यांनी काढली. पुन्हा १९७१ मध्ये एक छापखाना घेतला. परंतु तोही नीट चालला नाही. नंतर त्यांनी पुण्यात स्थलांतर केले. २१ मे १९७३ रोजी ते वारले.

केशव भिकाजी ढवळे या प्रकाशनसंस्थेने हजार-पंधराशे पुस्तके काढली. प्रासादिक धार्मिक-आध्यात्मिक, ज्योतिषविषयक, तत्त्वज्ञानविषयक अशा ग्रंथांबरोबर बालवाङ्मय क्षेत्रातही मोलाची भर घातली. सटीप दासबोध, श्रीगुरुचरित्र, सटीप ज्ञानेश्वरी, श्री गुरुलीलामृत, श्रीशिवलीलामृत, श्रीराम विजय, सार्थ श्रीदासबोध, सार्थ श्रीतुकारामाची गाथा, सार्थ श्रीएकनाथी भागवत, सार्थ श्रीज्ञानेश्वरी, मंत्रशास्त्र (शंकराचार्य), पातंजल योगदर्शन, चरित्र श्रीमद्भगवद्गीता, अर्थवशीर्ष, हनुमान चालिसा, दिव्यामृतधारा (आर्वीकर) बृहत् स्तोत्र रत्नाकर वगैरे पुस्तकांच्या आजही आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. ती सतत वाचकवर्गासमोर आहेत. इतर अनेक प्रकाशकांनी या स्वरूपाची पुस्तके काढली आहेत. परंतु ढवळे यांच्या पुस्तकांची जनमानसावरील पकड कायम आहे.

मराठीत मुलांसाठी उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करून बालवाचकांच्या अनेक पिढ्यांच्या अभिरुचीची जडणघडण त्यांनी केली. सानेगुरुजींच्या गोड गोष्टी, ना. धों. ताम्हणकर यांचे गोट्या-चिंगी वगैरे बालनायक, अरेबियन नाइटस, रॉबिनहूड, तीन शिलेदार, हितोपदेश, रॉबिन्सन क्रूसो, गोष्टींचा तास (११ भाग), नवलकथा (९ भाग), बालकल्पना रम्यकथा, बालपंचतंत्र (५ भाग), बुद्धिचातुर्य व शौर्यकथा (१८ भाग), बंडखोर बंड्या, मनोरंजक नीतिपाठ (४ भाग), विज्ञानकथा, सिंहासन बत्तिशी, सिंदबादच्या सात सफरी, हजरजबाबी बिरबल, राजा शिवाजी अशी कितीतरी नावे सहज आठवतात. बालसाहित्याच्या प्रकाशनाबाबत इतके सातत्य असणारी दुसरी प्रकाशन संस्था नाही. या पुस्तकांच्याही आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या; आणि त्यामुळे त्यांना क्लासिक्सचे स्वरूप लाभले.

सोन्याबापू (बाळकृष्ण गणेश) ढवळे यांच्या मुद्रणविषयक सौंदर्यदृष्टीला तोड नाही. ते

परफेक्शनिस्ट होते; आणि कुठल्याही पुस्तकाच्या मुद्रणापूर्वी अत्यंत बारकाईने संहितेचे संपादन व पुनर्लेखन निर्दोष हस्तलिखिताची सिद्धता करीत. पुस्तकाच्या संभाव्य वाचकाच्या वयोगटानुसार मुलांच्या पुस्तकाचा आकार, टाइप वळण, मांडणी, चित्रे, सजावट, कागद, मुखपृष्ठ आणि बांधणी याकडे लक्ष देत. त्यामुळे वर्षानुवर्षे ही पुस्तके तशीच निघत असूनही जुनाट व कालविसंगत वाटत नाहीत. अनेक नवे लेखक आणि चित्रकार त्यांनी घडवले. पुढे आणले.

१९६९ मध्ये बालसाहित्यजत्रा या मासिकासाठी सोन्याबापूंनी एक लेख लिहून बालवाङ्मयाच्या निर्मितीबद्दलचे आपले असमाधान प्रकट केले होते. ''एकशेआठ पुस्तकातून अंतर्बाह्य नीटनेटकी छापलेली अवघी सहा पुस्तके निघावी हे महाराष्ट्रातल्या मुद्रणधंद्याला नक्कीच भूषणावह नाही. महाराष्ट्रात उत्कृष्ट मुद्रण करणारे छापखाने खूपच आहेत. पण त्यांचे या मुलांच्या पुस्तकांच्या छपाईवर अजिबात लक्ष नाही आणि लक्ष घालण्याची त्यांची इच्छाही दिसत नाही. माझी अशी नम्र सूचना आहे की महाराष्ट्रातील प्रत्येक छापखानेवाल्याने वर्षाकाठी निदान एक तरी मुलांचे पुस्तक जिद्दीने नेटके आणि गोमटे छापून दाखवावे. यात भले लाभांश होणार नाही, पण महाराष्ट्रातल्या बालवाचकांचा दुवा खासच मिळेल आणि तोही थोडथोडका नव्हे, तर धंद्यात खूप बरकत मिळवून देईल एवढा!'' असे त्यांनी म्हटलेले होते आणि मुद्रकांना चौदावे रत्न दाखवण्याची वेळी आली आहे अशीही तंबी दिली होती.

दुर्दैवाने सोन्याबापूंना संपूर्ण समाधान लाभेल अशी पुस्तके अजूनही मराठीत दुर्मिळच आहेत. वॉल्ट डिस्ने, स्कोलॉस्टिक वगैरे परदेशी प्रकाशनसंस्थाच आता भारतात आपले साम्राज्य स्थापन करतील. मराठी प्रकाशन संस्थांचे दारिद्र्य त्यामुळे अधिकच नजरेत भरेल. असो! आम्ही या संस्थेला शताब्दीनिमित्त शुभेच्छा देतो. नव्या पिढीने हा थोर वारसा अधिक समृद्ध करावा.

– संपादक

ग्रंथप्रेमींसाठी खुषखबर !

आपल्यासाठी आम्ही एक आकर्षक सवलत योजना जाहीर करीत आहोत. आपण मे ९९ पासून १० महिने दरमहा १०० रु. ची मनीऑर्डर पाठवा. मार्च २००० मध्ये १५०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व दर्जेदार पुस्तके घरपोच मिळवा.

आमचा पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

मुलाखत

अमेरिकेत मराठी माणसे खूप आहेत, परंतु त्यांच्यापर्यंत मराठी पुस्तके पोचणे अवघड– अनिल मेहता

अमेरिकेतील सॅन होजे येथे ४-५ जुलै रोजी भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनामध्ये अखिल भारतीय मराठी प्रकाशनसंघटनेतर्फे मराठी पुस्तकांचा एक स्टॉल ठेवण्यात होता. त्या स्टॉलची सर्व जबाबदारी या संघटनेचे अध्यक्ष शरद गोगटे आणि अनिल मेहता यांनी घेतली होती. एप्रिलमध्येच सुमारे पाचशे नवीन पुस्तकांची निवड करून प्रत्येकी २/३ प्रती अशी बाराशेवर पुस्तके जलमार्गाने पाठवण्यात आली. ती सर्व जूनच्या शेवटच्या आठवड्यात व्यवस्थित पोचली. संमेलनात ग्रंथाली आणि मॅजेस्टिक बुकस्टॉल यांचेही स्टॉल होते. ग्रंथालीचे दिनकर गांगल आणि सुदेश हिंगलसकर तर मॅजेस्टिकचे अनिल कोठावळे उपस्थित होते. अधिवेशनाला सुमारे पंधराशे कुटुंबांतील साडेचार हजारावर प्रतिनिधी उपस्थित होते. विख्यात शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी उद्‌घाटन केले. आशा भोसले यांची मुलाखत सुधीर गाडगीळ यांनी घेतली. माधुरी दीक्षित यांनीही उपस्थित राहून मुलाखत देता देता गाडगीळांची नक्कल करून मजा आणली. कार्यक्रम भरगच्च होते. एकविसाव्या शतकात पदार्पण करताना मराठी माणसाची विश्वात्मक महत्त्वाकांक्षा प्रज्वलित व्हावी असे एकूण चर्चाविषय आणि वातावरण होते. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता हे दि. २४ जुलै रोजी भारतात. परतले. या संमेलनाबाबत श्री. शंकर सारडा यांनी त्यांची मुलाखत घेतली. तिच्यातील काही भाग येथे देत आहोत.

प्रश्न– अमेरिकेतील या अधिवेशनाला साडेचार हजार प्रतिनिधी आले होते; आपण नेलेली हजारबाराशे पुस्तके चुटकीसरशी संपली असणार, असे वाटते. प्रत्यक्षात काय अनुभव आहे?

मेहता– तुमच्याप्रमाणेच आमचीही अपेक्षा होती. परंतु खरे सांगायचे तर अपेक्षेएवढा प्रतिसाद पुस्तकांच्या विक्रीबाबत दिसला नाही. या अधिवेशनाला साडेचार हजार प्रतिनिधी आले होते; परंतु या संख्येत निम्मीअधिक मुलेच होती. कुटुंबच्या कुटुंब अधिवेशनासाठी आलेले; त्यामुळे प्रतिनिधींची संख्या मोठी असली तरी कुटुंबाची संख्या हजार-पंधराशेच्या

घरात असणार. तेथे जन्माला आलेल्या व वाढलेल्या मुलांना मराठी फारसे येत नाही. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणी आमच्या स्टॉलकडे येण्याचेही कष्ट घेतले नाही.

प्रश्न– परंतु त्यांचे पालक तर मराठी जाणणारे असतात.

मेहता– त्यात दोन प्रकार करावे लागतील. येथे पदवी घेऊन, इंजिनिअर, डॉक्टर होऊन गेलेले जे लोक आहेत, त्यांना साहित्यात व भारतीय संस्कृतीत रस आहे. ते थोडीफार पुस्तके खरेदी करतात. मराठी वाचतात. नव्या साहित्याबद्दलही जिज्ञासा बाळगतात. परंतु संगणकाशी संबंधित असे जे तरुण अमेरिकत सिलिकन व्हॅलीत स्थायिक होत आहेत, त्यांना मराठीची आवड असली तरी वाचनाला किंवा अन्य छंदांची जोपासना करायला वेळच नसतो. तशात या अधिवेशनात इतके भरगच्च कार्यक्रम होते की स्टॉलला भेट देण्यासाठी मोकळा वेळच नव्हता. त्यामुळे पुस्तकांचा उठाव हवा तसा झाला नाही. शेवटच्या दिवशी तर कुठलीही १० पुस्तके घ्या आणि ५० डॉलर्स द्या असे आम्ही जाहीर केले. त्या घोषणेला चांगला प्रतिसाद मिळाला.

प्रश्न– पुस्तके पाठवणे, स्टॉलचे भाडे वगैरे खर्च तरी निघाला का?

मेहता– छे छे! जर ४५०० डॉलर्सची विक्री झाली असती तर हा खर्च भागवून, मूळ प्रकाशकांना त्यांच्या पुस्तकाची किंमत रुपयात देता आली असती. तसा आम्ही हिशेब केला होता. परंतु काही अनपेक्षित खर्च वाढले. पुस्तकांची बंडले अधिवेशनाच्या जागी एका ठिकाणाहून स्टॉलपर्यंत आणण्यासाठी तेथील कामगार युनियनने आमच्याकडून ५७२ डॉलर्स घेतले; त्यामुळे आम्ही पार हबकलो. भारतातून पुस्तके अमेरिकेला पाठवायला जेवढा खर्च आला तेवढा तेथे पुस्तके काही मीटर्स अंतरावर नेण्यासाठी करावा लागला. या खर्चाची आधी काहीच कल्पना देण्यात आली नव्हती; त्यामुळे आमची मोठीच कुचंबणा झाली. सगळी पुस्तके विकली गेली असली तरी त्यामुळे नुकसान होणे टळले नसते.

प्रश्न– उरलेल्या पुस्तकांची काय व्यवस्था केली?

मेहता– सुदैवाने तेथे प्रगती प्रकाशनच्या एका नातलगांचा ग्रंथविक्रीचा व्यवसाय आहे. त्यांची रसिक डॉट. कॉम अशी इंटरनेटवर वेबसाइटही आहे. त्यामुळे ती पुस्तके परत आणावी लागली नाहीत. मेहता बुक्स डॉट कॉम ही आमची वेबसाइटही लौकरच रजिस्टर होईल.

प्रश्न– अधिवेशनातील इतर कार्यक्रमांना हजर राहिला का?

मेहता– स्टॉलची जबाबदारी गोगटे, सौ. शुभदा गोगटे व मी-अशा तिघांवर असल्याने या अधिवेशनातील इतर कार्यक्रमांना हजर राहण्यासाठी वेळच मिळण्यासारखा नव्हता. तशात या कार्यक्रमांसाठी १४७ डॉलर्सचे शुल्क होते. आमच्या बजेटमध्ये ते बसण्यासारखे नव्हते. सॅन होजे या शहरात मराठी कुटुंबे मोठ्या संख्येने राहतात; परंतु या शुल्कामुळे त्यापैकी फार थोडे मराठी लोक अधिवेशनाला उपस्थित राहिले.

प्रश्न– सॅन होजेला पाहण्यासारखी विशेष स्थळे कोणती आहेत?

मेहता– माझा पुतण्या मनीष मेहता सुदैवाने सॅन होजेलाच सॅप सॉफ्ट या संस्थेत सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून काम करतो. त्यामुळे त्याच्याबरोबर अनेक स्थळे सहजपणे पाहता आली. आयमॅक्स हे थिएटर घुमटाकार असून त्यात एव्हरेस्ट हा चित्रपट बघितला. शेरपा तेनसिंगचा मुलगा व दोन अन्य गिर्यारोहक एव्हरेस्ट चढत आहेत हे जणू आपण त्याच्याबरोबर आहोत अशा थाटात पाहता आले.

प्रश्न– पुस्तकांची दुकाने कुठली बघितली?

मेहता– बार्न स्नोबल हा अवाढव्य बुक स्टॉल पाहिला. किमान दहा हजार चौरस फूट त्याचा विस्तार असेल. त्यात कॉफी शॉप वगैरे सोयीही होत्या. सर्व प्रकारची पुस्तके आकर्षकपणे मांडलेली. किती पाहू किती नको असे होऊन जाते. दुसरेही एक दुकान पाहिले. तेथे जुनी पुस्तके अल्पकिंमतीत उपलब्ध होती. त्याचा विस्तारही मोठा होता.

प्रश्न– अधिवेशनानंतरही १५ दिवस तुम्ही अमेरिकेत होता. कुठे कुठे जाऊन आला?

मेहता– सॅन डिएगोचा १९ मैल परिसरात पसरलेला जगातील सर्वात मोठा झू पाहिला. त्यातील पंडा या प्राण्याचा शो अप्रतिम होता. डॉल्फिनच्याही करामती विलक्षणच! पक्ष्यांचाही शो नावीन्यपूर्ण होता. ग्रँड कनियनची पाच तासांची टूर केली. कोलोराडो नदीपर्यंत जाता येते– वर्षातील ३०० दिवस पाऊस असणाऱ्या सिॲटाल शहराचे उपनगर रेमंड हे गाव म्हणजेच बिल गेटसची 'मायक्रोसॉफ्ट सिटी'. त्याची टूर केली. तेथे बरेच भारतीय संगणक तज्ज्ञ उच्चपदावर आहेत. अवघ्या दहा वर्षात अमेरिकेतील सर्वात श्रीमंत माणूस बनण्याचा पराक्रम दाखवणारा बिल गेटस– अजूनही तेथे आलेल्या चाहत्यांना भेटतो. दोन-दोनशेच्या गटाने तो लोकांना भेटतो असे ऐकले. वेळ नसल्याने आणि तशी काही खास इच्छा नसल्याने आम्ही त्या फंदात पडलो नाही. तेथील स्पेसनीडलही प्रेक्षणीय आहे सिॲटलला शरद गोगटे यांची कन्या राहते. त्यानंतर सॅन फ्रॅन्सिस्कोला गेलो. गोल्डन गेट, समुद्र किनारा यांचा फेरफटका केला. लॉस एंजेलिसच्या हॉलीवूडची एक दिवसाची टूर केली. डिस्नेलँडला भेट दिली. परतताना सिंगापूरलाही दीड दिवसांची धावती भेट झाली. तेथील सेंटोसा गार्डन भव्य आहे. सीलाइफ पार्कमध्ये तीनशे प्रकारचे मासे आहेत. अत्यंत स्वच्छ शहर म्हणून सिंगापूरची जी ख्याती आहे ती सार्थच आहे.

प्रश्न– तुम्ही पूर्ण शाकाहारी. या दौऱ्यात खाण्यापिण्याचे फारसे हाल झाले नाहीत ना?

मेहता– शाकाहारी लोकांचे हाल होतातच. काही ठिकाणी इंडियन फूड मिळते. परंतु एरव्ही सँडविचेस, राइस, सॅलड, ब्रेड, ज्यूस यावर भागवावे लागते. नाहीतर हॉटेलात गेल्यावर फ्रेंच फ्राइड-बटाटे ही आपली फेव्हरिट डिश असतेच!

अनिल मेहता यांचा अमेरिकेचा हा दुसरा दौरा व्यवसाय आणि पर्यटन या दोन्ही दृष्टींनी नवीन जाणीव देणारा झालेला दिसला.

■

पास/नापास नो प्रॉब्लेम

शाळा/कॉलेज मधील विद्यार्थ्यांना
शिक्षण संपवून बाहेरच्या
व्यवहारी जगात प्रवेश करताना
स्वयंरोजगाराच्या वाटा दाखवणारी पुस्तके
प्रत्येक शाळा कॉलेज मधील
लायब्ररीसाठी अत्यावश्यक पुस्तके

मूल्य : रु. ५००/-
सवलत मूल्य : रु. ४००/-



मूल्य : रु. ५०/-
सवलत मूल्य : रु. ४०/-

प्रमोद प्रकाशन
१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.
फोन : ४४७८९९६

साहित्य वार्ता

मराठी माणसाचा विश्वसंचार!

सॅन होजे येथे बृहन्महाराष्ट्र परिषदेचे नववे संमेलन

'नव्या युगाच्या शुभप्रसंगी, गणराया नमू आरंभी, गाऊ उद्याचे मंत्र नवे, नव्या दिशा अन् पर्व नवे' लॉस एंजेलिसच्या गोपाळ मराठे यांनी संगीतबद्ध केलेल्या या गाण्याने तीन दिवस येथे सुरू असलेले या शतकातले शेवटचे मराठी अधिवेशन संपले. समारोपाच्या वेळीच गणरायाच्या गजरात नव्या सहस्त्रकाचे स्वागत करण्यात आले.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नवव्या संमेलनासाठी सुमारे पंचेचाळीसशेहून अधिक मराठी मंडळी जमली होती. अमेरिकेतल्या मराठी मंडळांखेरीज इंग्लंड, दुबई, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जपान आणि भारतातून मराठीप्रेमी संमेलनासाठी जमले होते.

परंपरेचा थोर वारसा आमच्यापाशी असे
विश्व उद्याचे असेल कैसे आम्ही ठरवणारे.
आम्ही हो मराठी रक्ताचे, उद्याचे विश्व घडवणारे!

असा ठाम विश्वास समूहगाण्यातून भव्य रंगमंचावर समारोपप्रसंगी व्यक्त केला गेला. सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डॉक्टर्स, इतर व्यावसायिक आणि तंत्रज्ञ यांजबरोबर महिलाही ठेवणीतल्या अस्सल महाराष्ट्रीय पोषाखात, आभूषणांसह तीन दिवस संमेलनात उत्साहाने सहभागी झाल्या. 'बे एरिया' हा तंत्रज्ञानासाठी प्रसिद्ध आहे. इथे होत असलेल्या अधिवेशनासाठी डॉ. जयंत नारळीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वैज्ञानिक आणि तांत्रिक बदलांच्या वेगाने आगामी शतकारंभी कसे बदल झालेले असतील, याविषयी डॉ. नारळीकरांनी आपल्या प्रदीर्घ भाषणात विवेचन केले. नव्या शतकाच्या आरंभीच्या १५-२० वर्षांमध्येच भारत विकसित झालेला असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याच सिलिकॉन व्हॅलीत आपल्या बहिणीकडे म्हणजे भारती आडकरकडे दरवर्षी मुक्कामाला येणाऱ्या अभिनेत्री माधुरी दीक्षितनं अचानकपणे 'कन्व्हेन्शन सेंटर'मध्ये हजेरी लावून सुखद धक्का दिला. रसिकांच्या आग्रहामुळे तिनं सुधीर गाडगीळ यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. उपस्थितांच्या मागणीवरून गाणंही म्हटलं आणि चक्क मुलाखतकार गाडगीळांचीच बोलता बोलता हुबेहूब नक्कल करून प्रचंड हंशा घेतला.

पुण्याचे महापौर दत्तात्रय गायकवाड, विकास अभियंता विजय केसकर आणि सतीश

मिसाळ, रमेश खन्नांसह काही नगरसेवक यांनी पुण्याहून आणलेला शंभर किलो वजनाचा शिवरायांचा पुतळा सॅन होजेच्या महापौरांच्या प्रतिनिधीने स्वीकारून पुणे-सॅन होजे मैत्रीची ग्वाही दिली. मुख्यमंत्री नारायण राणे यांच्या वतीने नियोजन मंडळाचे अध्यक्ष प्रकाश जावडेकर यांनी सोहळ्याला हजर राहून शुभेच्छा दिल्या. हॉटेल फेअर माऊंटच्या भव्य हॉलमध्ये अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी हा मैत्री समारंभ साजरा झाला. अधिवेशनाच्या निमित्ताने विश्वास गोडबोले यांनी स्वरबद्ध केलेले गीत नृत्य-नाट्याच्या माध्यमातून सादर करण्यात आले. अधिवेशन समितीचे अध्यक्ष सुहास पाटील यांच्या (मूळच्या पुण्याच्याच असलेल्या) पत्नी जयश्री पाटील यांनी हे गीत मुद्दाम लिहिलं होतं. वॉशिंग्टनच्या दिलीप चित्रे यांचेही 'भाळावरची अधोरिखिते आभाळप्रत नेऊ' हे गीत सादर करण्यात आले.

न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या भाषणाने आणि स्थानिक कलावंतांनी सादर केलेल्या 'खेळ मांडियेला' या संगीताच्या कार्यक्रमाने नंतरचा दिवस गाजला. प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या मनमोकळ्या मुलाखतीनं आणि समरसून म्हटलेल्या गाण्यांनी रात्र रंगली.

'नाच नाचुनी अति मी दमले'पासून 'बुगडी माझी सांडली ग'पर्यंत आणि 'पांडुरंग कांती' पासून 'ऋतुहिरवा'पर्यंत सर्व संगीतकारांच्या छटा त्यांनी मांडल्या. सुधीर गाडगीळांनी नाट्यसंगीताबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, आपण लवकरच 'मानापमान' मधली गाणी रंगमंचावर सादर करणार असल्याचं सांगून त्यांनी 'शूरा मी वंदिले' सुरू केलं आणि गाणं संपताच भावनावश स्वरात कारगिलच्या धारातीर्थी पडलेल्या जवानांची याद ठेवा असं आवाहन केलं. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मोरेश्वर पुरंदरे यांनी तत्काळ प्रतिसाद देऊन मंडळातर्फे जवाननिधी पाठवला जात असल्याचे सांगितले.

'भैरव ते भैरवी' हा स्थानिक कलावंतांचा कार्यक्रम दाद घेऊन गेला. चारुदत्त आफळेंचे कीर्तन झाले. विकास कशाळकर, अनुपमा सहस्त्रबुद्धे, अश्विनी खापर्डे, शुभांगी साखळकर यांच्या मैफिलीही चांगल्या रंगल्या. विनय भिडे यांना सर्वाधिक दाद मिळाली. वीणा सहस्त्रबुद्धे यांनी संगीतप्रेमी तरुणांसाठी एक कार्यशाळा घेतली. सुनीला प्रधान यांनी 'राधा माधव' हा एकपात्री प्रयोग केला, तर डॉ. वि. रा. करंदीकर 'मराठी संस्कृती' विषयी बोलले. अभिनेत्री अश्विनी भावे यांचीही मुलाखत झाली. एकांकिकाही सादर झाल्या.

पुण्याच्याच नीमा गुजर (मूळच्या नीलिमा मेहेर) यांच्या मार्गदर्शनाखाली खास मराठी पदार्थांचे स्टॉल्स होते. अलुरकरांच्या स्टॉलवरून मराठी गाण्यांच्या ध्वनिफितीही मिळत होत्या. ज्ञानप्रबोधिनीच्या सामाजिक कामाची माहितीही देण्यात आली. क्षमा वैद्य यांच्या नाट्यसंगीताच्या ध्वनिफितीचेही या वेळी प्रकाशन झाले. उद्योगधंद्यांविषयीचे परिसंवादही झाले. विश्वास पाटील यांच्या रणांगण या नाटकाचा प्रयोगही प्रेक्षकांना अत्यंत आवडला. त्याचप्रमाणे मराठी पुस्तक विक्रीचाही स्टॉल होता. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता हेही या संमेलनाला हजर होते.

सुहास पाटील, संजीव चित्रे, मोरेश्वर पुरंदरे, संध्या कर्णिक, अतुल वैद्य, हेमंत हब्बू आणि त्यांचे सहकारी गेले दीड वर्षे या अधिवेशनासाठी काम करीत होते.

चौदावे युरोपीय मराठी संमेलन

स्वित्झर्लंडमधील इंटरलाकन या निसर्गरम्य स्थळी १४ वे युरोपियन मराठी संमेलन नुकतेच पार पडले. त्याला फ्रान्स, इटली, जर्मनी, इझराएल, इंग्लंड वगैरे देशातून सुमारे ८०० प्रतिनिधी उपस्थित होते. गणपतीच्या साग्रसंगीत प्रतिष्ठापनेने संमेलनाचे उद्घाटन झाले. आरती मंत्रपुष्पांजली यामुळेही वातावरणातील भारतीयत्व अधोरेखित झाले. इस्रायली कलावंतांनी 'एकच प्याला'चा एक प्रवेश सादर केला. मुखवटे व चेहरे या दिलीप प्रभावळकर यांच्या कार्यक्रमाने प्रेक्षकांना हसवत ठेवले. शशिकला शिरगोपीकर यांनी गझलाचा कार्यक्रम सादर केला. आला शब्द वयात या कॅसेटमुळे संजीवनी बोकील यांनाही पाचारण करण्यात आले. त्यांच्या कार्यक्रमाचे निवेदन शशिकला शिरगोपीकरांनी केले. ''मग फेकुनि देईन वाळे पसरूनी दोनही हात। बेभान वाजते गाणे की आला शब्द वयात'' या ओळींचे प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. परदेशात राहूनही मराठी न विसरलेली माणसे तेथे दिसली. संजीवनी बोकील यांनी काव्यवाचनाचे तर व शिरगोपीकरांनी गझलगायनाचे सात-आठ कार्यक्रम केले. स्मिता तळवलकर, डॉ. नीतू मांडके हेही या संमेलनाला उपस्थित होते. प्रफुल्ल व बेला कुलकर्णी या दांपत्याने व त्यांच्या सहकाऱ्यांनी या संमेलनाचे देखणे व नेटके आयोजन केले होते.

ज्ञानेश्वरीचा जपानी अनुवाद

जपानमधील कनाजावा विद्यापीठातील महाराष्ट्र स्टडीज विभागातर्फे निघणाऱ्या 'महाराष्ट्र' या नियतकालिकात 'ज्ञानेश्वरी'च्या पहिल्या अध्यायाचा जपानी अनुवाद प्रसिद्ध करण्यात आला आहे. तेथे भारतीय विद्याशाखेचे प्राध्यापक डॉ. इवा ओशमा यांनी पाच वर्षांपूर्वी डॉ. अपर्णा संत यांच्या सहकार्याने अनुवादाला प्रारंभ केला. आजवर सात अध्यायांचे भाषांतर त्यांनी पूर्ण केले आहे. संपादक मंडळात काझुहिको हिरोनाका, हितेकी इशिदा, हिरोयुकी कोतानो, मसावी नायतो, तोशिया यमाझाकी आणि अनुवादक डॉ. इवाओ शिमा यांचा समावेश आहे. मूळ ओवी, तिचे गद्य जपानी भाषांतर आणि अवघड शब्दांचा जपानी अर्थ असा आकृतिबंध स्वीकारण्यात आला आहे.

डॉ. शिमा यांनी पुण्यातील ब्राह्मण, पंढरपुरचा विठोबा, शनिवार-नारायण पेठांतील मंदिरे, वगैरे विषयांवर जपानीत लेख प्रसिद्ध केले आहेत.

हेमिंग्वेच्या कागदपत्रांचा संग्रह

हेमिंग्वेची हस्तलिखिते, पत्रव्यवहार, त्याला मिळालेल्या भेटवस्तू वगैरे साहित्याचा

संग्रह बॉस्टनजवळच्या कोलंबिया पॉइंट येथील जेएफके लायब्ररीमध्ये ठेवण्यात आला आहे. त्यासाठी जॅकेलीन केनेडी आणि हेमिंग्वेची चौथी पत्नी मेरी वेल्श यांनी विशेष परिश्रम घेतले. क्युबामध्ये हेमिंग्वेचे वास्तव्य होते. तेथून बरीच सामग्री या लायब्ररीमध्ये काळजीपूर्वक पाठवण्यात आली. हेमिंग्वेने १९२१ ते १९६१ या ४० वर्षांच्या अवधीत ५५ कथा, एक कादंबरिका, सहा कादंबऱ्या, आणि दोन ललितेतर पुस्तके प्रसिद्ध केली. त्याच्या अप्रकाशित कागदपत्रांतून १९२३ च्या सुमाराला लिहिलेल्या आफ्रिकन सफारीवरील पुस्तक हेमिंग्वेच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रथमच प्रकाशित करण्यात आले.

लोकप्रिय गाण्यांचे संकलन

साहित्य प्रसार केंद्राने 'गाणी– मनातली, गळ्यातली' या लोकप्रिय उपक्रमानंतर आता एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. मुकुंदराज-ज्ञानेश्वरांपासून निवडक संत, पंत, शाहीर, केशवसुतांनंतरच्या या शतकातील महत्त्वाच्या व निवडक कवितांचे संकलन करण्याचे ठरवले आहे. हे संकलन परिपूर्ण व्हावे असे वाटणाऱ्या साहित्यप्रेमींनी, साहित्य प्रसार केंद्र, ९– डॉ. देशमुख लेन, विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगाव, मुंबई– ४ या पत्त्यावर संपर्क साधावा असे आवाहन मोरेश्वर पटवर्धन यांनी केले आहे.

ग्रामगीता– दहा रुपयांत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी लिहिलेला ग्रामगीता हा ग्रंथ वाचकांना अल्प किमतीत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तक मंडळाने या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली असून, हा ग्रंथ आकर्षक स्वरूपात केवळ १० रुपयांत वाचकांना उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे शिक्षणमंत्री श्री. अनिल देशमुख यांनी सांगितले.

खऱ्या रंगभूमीचे दर्शन अस्सल लोकनाट्यातूनच शक्य

कोणतीही रंगभूमी ही त्या समाजाच्या संस्कृतीतून येत असते; म्हणून लोकनाट्य व लोककला याद्वारेच खऱ्या रंगभूमीचे दर्शन घडते असे उद्गार प्रा. पुष्पा भावे यांनी ॲड. रंगनाथ डोळस संपादित 'फुले-आंबेडकर प्रेरणेची रंगभूमी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना नाशिक येथे काढले. दारात येणारा वासुदेव, पायात वाळी बांधणारा कीर्तनकार हे खरे नाटक करणारे आहेत, त्यांचा संबंध फुले-आंबेडकर रंगभूमीशी आहे. दुर्दैवाने या रंगभूमीचा इतिहास लिहिला गेला नाही; आणि महाराष्ट्रातील सुशिक्षित मध्यमवर्गाने ब्रिटिश रंगभूमीवरील नाटकच काय ते खरे असा दृढ समज उरी बाळगला. लोकनाट्य व लोककला यांची उपेक्षा केली, ही परिस्थिती आता बदलत आहे. दलित रंगभूमी व तिचे वेगळेपण, यांचा विचार होण्याची गरज आहे. दलित रंगभूमीने मुख्य प्रवाहात यावे असे आवाहन करणारे आपणास मुख्य प्रवाहाचे सूत्रधार मानतात, पण हा हक्क त्यांना कोणी दिला? मुख्य प्रवाहात तसे

नेमके काय आहे हे बघायला हवे. असे त्यांनी म्हटले. प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रावसाहेब कसबे हे होते.

नाशिकचे शिरीष जोशी 'साहित्यभूषण' परीक्षेत सर्वप्रथम

नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे मे १९९९ मध्ये घेण्यात आलेल्या 'साहित्यभूषण' परीक्षेत नाशिकचे शिरीष अंबादास जोशी ७१ टक्के गुण मिळवून सर्वप्रथम आले. त्यांना 'इंद्रायणी' हा एक हजार रुपयांचा पुरस्कार मिळाला आहे. द्वितीय क्रमांक नाशिकच्या सौ. प्रांजली अजय चाफळे यांनी मिळवला. नगर जिल्ह्यातील बारडगावचे देवराज सीताराम बोरूडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

सर्वोत्तम महिला प्रकाशक म्हणून उपाध्ये, बर्वे यांचा गौरव

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स या संस्थेतर्फे यावर्षी सर्व भारतीय भाषांतील अकरा महिला प्रकाशकांना पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये पुण्याच्या शशिकला उपाध्ये (चंद्रकला प्रकाशन) व मधुमिता बर्वे (मधुराज पब्लिकेशन्स) यांचा समावेश आहे.

ता. ३ जुलै रोजी केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण अडवानी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना श्री. अडवानी म्हणाले, ''मानवी जीवनात पुस्तकांचे महत्त्व आहे. भावी पिढीमध्ये पुस्तकांविषयी प्रेम रुजविण्यासाठी पालक-शिक्षकांप्रमाणेच प्रकाशकांनीही प्रयत्न करावेत. पुस्तकांच्या किमती वाढलेल्या दिसत असल्या, तरी एकूण सर्वच गोष्टी महाग झाल्या असल्याने केवळ पुस्तकांच्या किंमतीचा बाऊ केला जाऊ नये. उलट, समाजाचा कल हा पुस्तक खरेदी करण्याकडे वाढत राहणे हाच यावर उपाय आहे.'' फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स संस्थेचे अध्यक्ष दीनानाथ मलहोत्रा यांनी उपस्थितांचे स्वागत केले व नरेंद्रकुमार यांनी आभार मानले.

याच समारंभात फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स संस्थेतर्फे युद्धनिधीसाठी दोन लाख एकवीस हजार एकशे एक रुपयांचा धनादेश अडवानी यांच्याकडे देण्यात आला.

साहित्य अकादम्या बंद करा– खुशवंतसिंग

''बांडगूळ साहित्यिकांना पोसणाऱ्या साहित्य अकादम्या बरखास्त करा, लेखकांना कोणत्याही प्रकारे राजाश्रय देखील देऊ नका. त्यांना आपल्या लिखाणाच्या बळावर जगू द्या. दोन चांगल्या ओळी लिहिण्याची औकात नसलेल्या लेखकांनी साहित्य अकादमीच्या जागा अडवल्या आहेत. साहित्य अकादम्यांचा त्यांनी राजकारणी अड्डा बनवला. पुरस्कारांचा बाजार भरवला. थोडा पैसा इधर दे दिया, उधर ॲवार्ड दे दिया हाच या अकादम्यांचा उद्योग आहे. म्हणून या अकादम्या बंद करा'' असे विचार विख्यात पत्रकार खुशवंतसिंग यांनी व्यक्त केले आहेत

इण्डेमाऊची गाणीचे प्रकाशन

सौ शशिकला उपाध्ये यांचे चिरंजीव संजय उपाध्ये यांच्या इण्डेमाऊची गाणी या बालगीतांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्या वेळी स्वतः संजय उपाध्ये इण्डेमाऊच्या रूपात व्यासपीठावर आले. नीहार शेंबेकर या बालगायकाच्या हस्ते प्रकाशन झाले. अपर्णा संत यांनी एक गीत तालासुरात सादर केले. गप्पाष्टक हा एकपात्री कार्यक्रमही संजय उपाध्ये यांनी सादर केला.

हरोलीकरांच्या चरित्र लेखनासाठी संदर्भ साहित्य हवे

गांधीवादी कार्यकर्त्या पद्मावती हरोलीकर (१८९१-१९९२) यांच्यावर डॉ. सरोजिनी वैद्य या चरित्रपर पुस्तक लिहिणार आहेत. पुणे सोलापूर भागात विविध प्रकारच्या सामाजिक विधायक कार्यात त्यांचा सहभाग होता. वयाच्या दहाव्या वर्षी वैधव्य आल्यावर सत्यभामाबाई कुवळेकर यांनी पुनर्विवाह केला आणि त्यांचे नाव पद्मावती हरोलीकर झाले. त्यांच्याविषयी आठवणी, पत्रे वगैरे सरोजिनीबाईंना हवी आहेत.

संपर्क– आफ्रिका हाऊस, एडनवाला रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९.

शांता शेळके यांची अक्षरगाणी

अ ते ज्ञ पर्यंतच्या अक्षरांवरील अभिनव गाणी व अंक उजळणी शांता शेळके यांनी लिहिली असून, ज्ञानदा प्रकाशनने घरगुती कार्यक्रमात अरुणा ढेरे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन केले. मुलामुलींनी ही अक्षरगाणी हावभावासह म्हणून या कार्यक्रमाला रंगत आणली.

दुर्बोधता व क्लिष्टता टाळा.

चिंतनाच्या अभावामुळे लेखनात दुर्बोधता आल्याचे अनेकदा जाणवते; तसेच व्यासंगाचा आभास निर्माण करण्याच्या नादात अनेकदा लेखनात क्लिष्टता येते. या दोन्ही गोष्टी टाळण्यावर भर हवा असा सल्ला अंतर्नादचे संपादक भानू काळे यांनी 'शब्दमित्र' आयोजित मुलाखतीच्या वेळी नवलेखकांना दिला.

नामदेव महाद्वारासाठी धरणे धरणार

नामदेव महाराजांच्या संजीवन समाधीस ६५० वर्षे पूर्ण होत आहेत; त्यानिमित्ताने पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या प्रवेशद्वाराशी असलेल्या नामदेव पायरीजवळ महाद्वार उभारण्याचा संकल्प संतशिरोमणी नामदेवमहाराज शतकोत्तर महोत्सव समितीच्या बैठकीत जाहीर करण्यात आला. पंढरपूर नगरपरिषदेने या महाद्वाराच्या उभारणीस परवानगी न दिल्यास २५ ऑगस्टपासून धरणे धरावे असे डॉ. नि. ना. रेळेकर यांनी सुचवले

समाजाच्या विधायक वाटचालीसाठी माहितीचे दारिद्र्य दूर व्हावे.

समाजाची विधायक दृष्टीने वाटचाल होण्यासाठी 'माहितीचे दारिद्र्य' दूर होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण निगवेकर यांनी केले.

कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम (कास्प) या संस्थेच्या प्रसारमाध्यम सेवा प्रकल्पाचे उद्घाटन त्यांनी केले. या वेळी 'कास्प'च्या 'अंगण' आणि 'आपली मुलं' या नियतकालिकांचे प्रकाशनही झाले.

डॉ. निगवेकर म्हणाले, ''सकारात्मक गोष्टीचे महत्त्व आपल्या प्रसिद्धीमाध्यमांना आता समजू लागले आहे; पण त्यांना अशा घटनांची माहिती मिळण्यात अडचणी येतात. 'कास्प'च्या उपक्रमामुळे त्या दूर होतील. हे होत असतानाच समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्याची आवश्यकता आहे. समाजातील सुप्त तर्कशक्ती जागृत होईल, तेव्हाच आपल्यात अपेक्षित बदल होईल.''

'मिळून साऱ्याजणी'च्या संपादिका विद्या बाळ म्हणाल्या की उपेक्षित आयुष्य जगणाऱ्या मुलांना सन्मानाने आयुष्य जगता यावे, यासाठी सरकारपेक्षा लोकांनीच पुढाकार घेऊन प्रयत्न केले पाहिजेत.

सावरकरांना बहुजन समाजापासून तोडण्याचा कुटिव डाव

'सावरकरांना ब्राह्मण्यवादी, मनुवादी, चातुर्वर्ण्यवादी ठरवून बहुजन समाजासमोर आणि दलितांसमोर त्यांची काळीकुट्ट प्रतिमा उभी करण्याचा जाणीवपूर्वक व अश्लाघ्य प्रयत्न होत आहे. पुरोगाम्यांच्या या दुष्ट कारस्थानाद्वारे सावरकरांना बहुजन समाजापासून तोडण्याचा अयशस्वी प्रयत्न सध्या महाराष्ट्रात चालू आहे', असे प्रतिपादन १५ व्या सावरकर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. शेषराव मोरे यांनी परभणी येथे केले.

१६ जुलै रोजी संमेलनाचे उद्घाटन विक्रम सावरकर यांच्या हस्ते झाले. आपल्या भाषणात प्रा. मोरे पुढे म्हणाले की, हिंदुत्ववाद्यांतील या बुद्धिवादी समाजक्रांतिकारकाला बदनाम करून संपविण्यासाठी महाराष्ट्रातील पुरोगामी कटिबद्ध झाले आहेत. आपल्याला बुद्धिवादावर आणि विज्ञाननिष्ठेवर समाज उभा करावा लागेल.

अकरा पुस्तकांचे इंदूरमध्ये प्रकाशन

माळव्यातील नऊ मराठी साहित्यिकांच्या अकरा पुस्तकांचे प्रकाशन ता. ३ जुलै रोजी इंदूर येथे झाले. इंदूरच्या मराठी भाषा सन्मान रक्षण समितीने हा कार्यक्रम घेतला.

ग. वा. कवीश्वर यांचे 'महाभारतातील गूढ रहस्ये', प्रभाकर अडसुळे यांचे 'अथा तो मृत्यू जिज्ञासा' व इतर दोन पुस्तके, मेजर जी. एच. खोचे यांचे 'भक्तिसाधना', डॉ. शशिकांत जोशी यांचे 'घे जन्म तू फिरूनी', प्रदीप मोघे यांचा 'घाबरलेली माणसे' हा कथासंग्रह,

सुशीलाताई कुलकर्णी यांचा 'भावगंगा' हा गीतसंग्रह, चंद्रकांत जोशी यांच्या 'चांदीचे रूप, सोन्याचे अंग' व अलकनंदा साने यांच्या 'धग' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. प्रसिद्ध वात्रटिकाकार रामदास फुटाणे, कवी फ. मु. शिंदे, अरुण म्हात्रे, संदेश ढगे व ज्येष्ठ कवयित्री उषा बढे आदी कवी संमेलनात सहभागी झाले होते.

उद्योगांमध्ये मराठीचा वापर

मराठी कामगारांची मोठी संख्या असलेल्या मुंबईसारख्या शहरातील औद्योगिक प्रकल्पांत आणि अनेक कारखान्यांत मराठीचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजे, असे जागतिक मराठी परिषदेचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी एका बैठकीत सांगितले.

मराठी ही ज्ञानभाषा कशी करता येईल आणि मराठीचा वापर विविध क्षेत्रांत कसा वाढविता येईल, या दृष्टीने निरनिराळ्या संस्था कोणते काम करीत आहेत, याची माहिती घेण्यासाठी विविध प्रतिनिधींची बैठक मराठी विज्ञान परिषदेच्या कार्यालयात ४ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. जागतिक मराठी परिषदेचे कार्याध्यक्ष व प्रसिद्ध साहित्यक प्रा. के. ज. पुरोहित बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

एच. एच. केळकर अँड कपंनीचे संचालक सुरेश वझे यांनी औद्योगिक कारखान्यांतून संबंधित कामगारांना विविध प्रक्रियांचे ज्ञान मराठीतून देण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. ते म्हणाले, ''कारखान्यातील कामगार अनेक प्रकारची कामे करतात. परंतु आपण नेमके काय काय करतो आणि त्याचा परिणाम काय होतो, हे त्यांपैकी अनेकांना माहीत नसते. ते त्यांना मातृभाषेत समजावून देणे आवश्यक आहे.''

जागतिक मराठी अकादमीचे कार्याध्यक्ष राधाकृष्ण नार्वेकर यांनी 'मराठी टिकवा, मराठी वाचवा' या चळवळीद्वारे मुंबई शहरात विविध संस्थांतर्फे सुरू असलेल्या कामांची माहिती दिली. या बैठकीला सिंधू जोशी, प्रा. रा. वि. सोवनी. लक्ष्मण लोंढे, शशी भालेकर, वि. वि. देशपांडे, शरद नाईक आदी मंडळी उपस्थित होती.

साहित्य संस्कृती व समाजसंस्कृती यांचे प्रारूप दांडेकरांमध्ये दिसते.

लेखक व माणूस म्हणून असलेल्या गो. नी. दांडेकर यांच्या ब्रह्मांडरूपाचे आणि समकालीन कला, वाङ्मय, संस्कृतीचे शलाकादर्शन 'स्मरणे गोनीदांची' या पुस्तकातून होते, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी ८ जुलै 'गोनीदा'च्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले 'गोनीदां'विषयी साहित्यिक, कलावंत आणि सुहृदांनी लिहिलेल्या आठवणींच्या या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते झाले, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते डॉ. रवींद्र लोहोकरे यांना 'मृण्मयी पुरस्कार'

देण्यात आला.

'गोनीदां'सारखे साहित्यिक म्हणजे साहित्यसंस्कृती व समाजसंस्कृती यांची प्रारूपे असतात, असा उल्लेख करून जाधव म्हणाले, ''या आठवणी म्हणजे त्यांचे पुनर्दर्शन नाही. माणूस व लेखक म्हणून आपल्याला ज्ञात असलेल्या त्यांच्या रूपाचा पुनर्वेध लेखात घेण्यात आला आहे. म्हणून या आठवणी म्हणजे फक्त 'गोनीदा'चे प्रतिबिंब नाही, तर कला, वाङ्मय आणि सांस्कृतिक क्षेत्रात काम केलेल्या त्यांच्या सुहृदांचेही दर्शन त्यात होते.''

'गोनीदा' म्हणजे अस्सल देशी साहित्यिक ''देशीयतेचा सारा आकृतिबंध त्यांच्या साहित्यात दिसतो. दुर्गसंस्कृतीचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या साहित्यातून केला. त्यामुळे त्यांचा जन्मदिन दुर्गसंस्कृती दिन म्हणून साजरा करण्याची गरज आहे.''

प्राचार्य भोसले म्हणाले, '' 'गोनीदा' म्हणजे शब्दांचे सामर्थ्य पणाला लावून वाचकाला वेड लावणारे फकीर होते. रामायण-महाभारत यांबाबत वाल्मिकी आणि व्यास यांनी जे काम केले तेच 'गोनीदा' आणि बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवछत्रपतींच्या बाबतीत केले. या दोघांना खरे तर 'नरदुर्ग'च म्हटले पाहिजे.''

'स्मरणे गोनीदांची'च्या संपादिका डॉ. वीणा देव यांनी या ग्रंथाच्या निर्मितीची माहिती दिली.

अण्णा भाऊ साठे यांचे वस्तुनिष्ठ चरित्र हवे

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचा उलगडा होणे जरूर आहे. त्या दृष्टीने नव्या पिढीच्या लेखकांनी त्यांचे केवळ भावनिक चित्र न रेखाटता वस्तुनिष्ठ चरित्र समजावून घेण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन प्रा. केशव मेश्राम यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेत अण्णाभाऊंच्या तिसाव्या पुण्यतिथीनिमित्त केले. अण्णाभाऊंनी चटकदार लिहिले पण चटोर लिहिले नाही, लेखणी हेच त्यांचे शस्त्र होते. त्यांनी लिहिलेल्या चाळिसावर कादंबऱ्यांपैकी आठ-दहा कादंबऱ्या रंजनप्रधान असल्या तरी त्या भावना चाळविणाऱ्या नाहीत, असेही ते म्हणाले.

'नचिकेताचे उपाख्यान'ला मोकाशी पुरस्कार

संजय जोशी यांच्या 'नचिकेताचे उपाख्यान' या कादंबरीला दि. बा. मोकाशी यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रथम प्रकाशित उत्कृष्ट कथा, कादंबरी, प्रवासवर्णन यांपैकी एका वाङ्मय प्रकारातील पुस्तकाला एक हजार रुपयांचा पुरस्कार मोकाशींच्या नावे देण्यात येतो. 'नचिकेताचे उपाख्यान'ला यापूर्वी ना. सी. फडके पुरस्कार व महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झालेले आहे. संजय जोशी हे एटी अँड टी या सेल्युलर फोन कंपनीत अकाउंटस खात्यात अधिकारी आहेत.

बॅ. वि. म. तारकुंडे यांना न्यायमूर्ती रानडे पुरस्कार

माजी न्यायमूर्ती बॅ. वि. म. तारकुंडे यांना राष्ट्रीय सामाजिक परिषद व भारतीय मूलवादी मानवतावादी संघटना यांच्यातर्फे बुधवार ता ३० जून रोजी 'न्यायमूर्ती रानडे पुरस्कार' वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या हस्ते देण्यात आला.

समाजप्रबोधनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. पाच हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

राजर्षी शाहू महाराज ग्रंथ पुरस्कार

कोल्हापूरच्या शाहू मेमोरियल ट्रस्टने शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीच्या निमित्ताने राजर्षी शाहू ग्रंथ पुरस्काराची घोषणा केली आहे. हा पुरस्कार ५ हजार रुपयांचा असून तो दर दोन वर्षांनी देण्यात येईल. शाहू महाराजांच्या जन्मशताब्दीपासून म्हणजे, १९७४ पासून आजतागायत मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषांत प्रसिद्ध झालेल्या शाहू महाराजांच्या जीवनकार्याशी व विचाराशी संबंधित ग्रंथाच्या दोन प्रती राजर्षी शाहू महाराज ट्रस्ट, दसरा चौक, कोल्हापूर येथे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एम. जी. वाघ यांना वरेरकर पुरस्कार

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या नाट्यलेखनस्पर्धेत ओझर टाऊनशिप, नाशिकचे एम. जी. वाघ यांच्या उदय या नाटकाला दुसरा पुरस्कार आठव्या कामगार साहित्य संमेलनात सांस्कृतिकमंत्री प्रमोद नवलकर यांच्या हस्ते देण्यात आला.

डॉ. अरुणा ढेरे

'सुंदर जग हे' या बाल काव्यसंग्रहाबद्दल डॉ. अरुणा ढेरे यांना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (एनसीइआरटी) तिसाव्या राष्ट्रीय बालसाहित्य स्पर्धेत ५००० रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ५ ते ९ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये निसर्ग आणि पर्यावरण याबद्दल जागरुकता वाढविणाऱ्या कविता या पुस्तकात आहेत.

नगर वाचन मंदिराचे तीन ग्रंथपुरस्कार

पुणे नगर वाचन मंदिरातर्फे दरवर्षी प्रत्येकी एक हजार रु.चे तीन ग्रंथपुरस्कार देण्यात येतात. यंदाचे पुरस्कार १९९९ मधील (१ जानेवारी ते १० डिसेंबर) ग्रंथांना देण्यात येणार आहेत. १३ जानेवारी– श्री. ज. जोशी पुरस्कार (उत्कृष्ट कथासंग्रहास) ७ फेब्रुवारी– कवी ह. स. गोखले पुरस्कार (संतवाङ्मयविषयक ग्रंथास) ६ मार्च– प्रा. श्री. ना, बनहट्टी ग्रंथ पुरस्कार, (ललितेतार वैचारिक स्वरूपाच्या ग्रंथास)

पुरस्कारांसाठी पुस्तकाच्या दोन प्रती पाठवाव्यात.

पत्ता : कार्यवाह, पुणे नगर वाचन मंदिर, बेलबागेसमोर, लक्ष्मीरोड, पुणे २.

केशव भिकाजी ढवळे शताब्दी समारोह समिती

केशव भिकाजी ढवळे प्रकाशन संस्था गणेशचतुर्थीला शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त दि. २९ ऑगस्ट १९९९ रोजी शुभारंभाचा कार्यक्रम मुबई येथे होणार आहे. विविध साहित्यसंस्थांच्या व प्रकाशन संघांच्या मदतीने पुणे, नागपूर, औरंगाबाद, हैद्राबाद, भोपाळ, गुलबर्गा, कोल्हापूर, रत्नागिरी वगैरे ठिकाणीही कार्यक्रम वर्षभर होणार आहेत. समितीचे अध्यक्ष जयंत साळगावकर असून कार्याध्यक्ष सदानंद भटकळ आहेत. उपाध्यक्ष- श्री. पु. भागवत, चिं. स. लाटकर, शरद गोगटे, विजय कुवळेकर. कार्यवाह– पांडुरंग कुमठा, अनंत चितळे, प्रकाश रायकर, विकास परांजपे, कोषाध्यक्ष– माधव भागवत, अंजली सरदेसाई. सदस्य– ग. का. रायकर, ल. गो. परांजपे, कांताशेठ नेरूरकर, शंकर सारडा, अप्पा परचुरे, अनिल मेहता, अशोक कोठावळे, वामन देशपांडे, अशोक बेंडखळे, रत्नाकर कुलकर्णी, अरविंद टिकेकर, श. पु. पुरोहित, श्रीनिकेतन ढवळे, ज्योती धनंजय ढवळे.

कार्यालय– सदानंद भटकळ, सी-२ आनमंदाश्रम, वाडीलाल पटेल मार्ग, मुंबई -

साहित्य संमेलन - अध्यक्षीय साहित्य सूर्यमाला

मराठी प्रकाशन, नाशिक या संस्थेतर्फे शं. ना. अंधृटकर हे साहित्य संमेलनांचे अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांची माहिती देणारा संदर्भ ग्रंथ ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध करणार आहेत. म. श्री. दीक्षित व मनोहर पुरंदरे यांचे सहाय्य त्यांना लाभणार आहे.

संपर्क– शं. ना. अंधृटकर, बी– ६९, नाइस, सातपूर, नाशिक ४२२००७. फोन (०२५३) ३५०२५१.

■

'ओशो' यांच्या रसाळ प्रवचनांवरील पुस्तके

एक एक पाऊल : ओशो	अनु. भारती पांडे
हसत खेळत ध्यानधारणा : ओशो	अनु. मीना टाकळकर
मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो	अनु. मृणालिनी गडकरी
ध्यानसूत्र : ओशो	अनु. माधव कर्वे



धवल-गिरी

- प्रकांड पंडित, तत्त्वज्ञ, योगी, संत, ब्रह्मलीन महर्षी न्यायरत्न विनोद यांचा एक अलौकिक ग्रंथ.
- अध्यात्मसाधनेसाठी सर्वार्थाने उपयुक्त ठरलेला ग्रंथ.
- रूपकात्मक पद्धतीने केलेली कथारूप मांडणी
- अध्यात्मातील संकल्पनांचे हळुवारपणे व समर्थपणे उलगडत जाणारे पैलू.
- आयुष्यात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणतील अशी आशयपूर्ण 'ध्यानबीजे'.
- साधनेची खोली व उंची वाढवणारा साध्या, सोप्या भाषेतील अपूर्व ग्रंथ.

प्रमोद प्रकाशन

१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.
फोन : ४४७८९९६

लेखक : महर्षी न्यायरत्न धु. गो. विनोद

♦ **मूल्य :** रु. २००/-
♦ **सवलत मूल्य :** रु. १४०/-



परदेश प्रवासातील
योगचिंतन

हे पुस्तक म्हणजे नुसते प्रवासवर्णनच नव्हे, तर ते आहे एक प्रकट चिंतन– एका सुप्रसिद्ध, उच्चविद्या विभूषित आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या योग्याचे!

परदेश प्रवास करीत असताना त्यांना आलेल्या विविध प्रकारच्या अनुभवांचे!

भेटलेल्या व्यक्ती व पाहिलेल्या घटनांद्वारे घडलेल्या एका आंतर्यात्रेचे! जीवनविषयक समस्यांचे, त्यावरील समर्पक उत्तरांचे आणि तेही सर्वांना समजेल अशा भाषेतले!

प्रमोद प्रकाशन

१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.
फोन : ४४७८९९६

लेखक : डॉ. संप्रसाद विनोद

मूल्य रु. १२०/-
सवलत मूल्य रु. ८०/-

श्रद्धांजली

जगदीश गोडबोले

पश्चिम घाट बचाव आंदोलनाचे प्रणेते, पर्यावरणाचे अभ्यासक व लेखक जगदीश गोडबोले (वय-५५) यांचे १५ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

लहानपणापासूनच असलेली भटकंतीची आवड जोपासत त्यांनी पर्यावरणाच्या कामात स्वतःला झोकून दिले होते. प्रथम एका खासगी कंपनीत करीत असताना त्यांनी पर्यावरणाचे कामही सुरू ठेवले. नंतर त्यांनी ही नोकरी सोडून पर्यावरणाचे काम करणारी 'जीवन संस्था' स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून गोडबोले यांनी शिळीम, जवण, तिकोनापेठ, आजीवाली व काशीग या पवनेच्या पाणलोट क्षेत्रातील गावांत त्यांनी विशेष कार्य केले.

संस्कारक्षम वयातच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती होऊ शकते, यावर त्यांचा दृढ विश्वास असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या सान्निध्यात नेले. 'हाकारा' या नियतकालिकेचे ते संपादक होते. नियतकालिकातून त्यांनी पर्यावरणविषयक माहितीपर लेख प्रसिद्ध केले. चिपको आंदोलनाची पहिली ओळख गोडबोले यांच्यामुळे महाराष्ट्राला झाली. पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी त्यांनी 'पश्चिम घाट बचाव' आंदोलन केले. पर्यावरणविषयक 'भटकंती गढवालची' या त्यांच्या पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाला. 'लांडगा आला रे आला', 'मोहीम इंद्रावतीची', 'प्रेरणा चिपकोची', 'हरिण-पारधी', 'पारध' आदी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्यासमवेत पाच वर्षे त्यांनी कुष्ठरोग्यांची सेवा करण्याचे काम केले. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले.

इंदुताई टिळक

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या इंदुताई टिळक (वय ७४) यांचे १५ जुलै रोजी दीर्घकालीन आजाराने निधन झाले.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या नातसून असलेल्या इंदुताई अर्धांगवाताच्या

विकाराने आजारी होत्या.

इंदुताई टिळक यांनी जयंतराव टिळक यांच्या पत्नी अशी आपली ओळख न ठेवता, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करून वेगळा ठसा उमटविला. दै. 'कोकण केसरी' व 'सह्याद्री' मासिकाच्या संपादिका म्हणून त्यांनी काम पाहिले. गोवा मुक्ती आंदोलनात त्यांनी निदर्शकांसाठी पोळ्या-भाकरी करून आंदोलनाला साथ दिली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महिला आंदोलकांच्या तुकडीचे नेतृत्व त्यांनी केले.

जपानी पुष्परचना इकेबाना आणि कागदाच्या विविध वस्तू तयार करण्याच्या ओरिगामी कलेत त्या पारंगत होत्या. ह्या कलेच्या प्रसारासाठी त्यांनी काम केले, अनेक पुस्तके लिहिली.

'लोकमान्यांच्या गोष्टी' 'मुलांसाठी लोकमान्य' याबरोबरच गीतारहस्यावरही त्यांनी पुस्तके लिहिली. इकेबाला पुष्परचना आणि ओरिगामीच्या मार्गदर्शनासाठी त्या वर्ग चालवीत. त्यांना बागकामाचा छंद होता. पुणे कॅक्टस सोसायटीच्या त्या संस्थापिका होत्या.

अनाथ हिंदू महिलाश्रम, हुजुरपागा, सेवासदन या संस्थांच्या विकासात त्यांचा मोठा वाटा होता. या संस्थांच्या विविध अधिकारपदांवर त्यांनी काम पाहिले.

विनोदमूर्ती वसंत शिंदे

मूकपट, नाटक, लोकनाट्य आणि बोलपटापर्यंतच्या ७५ वर्षांच्या प्रदीर्घ अशा कला जीवनाची वाटचाल करण्याचे दुर्मिळ भाग्य विनोदमूर्ती वसंत शिंदे यांना लाभले. भारतीय चित्रपटाचे युग दादासाहेब फाळके यांच्या ज्या राजा हरिश्चंद्र या चित्रपटाने सुरू झाले, त्या काळापासून चित्रपट आणि नाट्यसृष्टीत जी जी स्थित्यंतरे झाली, त्यांचे ते साक्षीदार होते. पाटील आणि तमाशा याच विषयाच्या विळख्यात मराठी चित्रपट सुमारे चाळीस वर्षे सापडला होता. त्या कालावधीत तब्बल १३० चित्रपटांत निष्ठावान गड्याचे काम करण्याचा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. सहज अभिनय करण्याची देणगी लाभलेल्या या नटाने रंगभूमीच्या पडत्या काळात तिचीही सेवा करून तिला जगवण्याचा जो प्रयत्न केला, त्याचीही नोंद घ्यावी लागेल. दादासाहेब फाळके, नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर, भालजी पेंढारकर, दिनकर (कामण्णा) ढेरे यासारख्या दिग्गजांचे संस्कार झाल्यामुळे या कलाकाराचे कार्यकर्तृत्व फुलले. शिस्त, स्वावलंबन आणि वक्तशीरपणाबाबत फाळके अतिशय काटेकोर असत. हे संस्कार शिंदे यांनी आपल्याही आयुष्यात आत्मसात केले. अभिनयाच्या शास्त्रोक्त शिक्षणाचे धडे त्यांनी चिंतामणराव कोल्हटकरांकडून घेतले. 'भावबंधन'मध्ये कामण्णाची भूमिका करणाऱ्या दिनकर ढेरे यांचा प्रभावही त्यांच्यावर मोठा होता. ढेरे ही भूमिका इतकी उत्तम वठवत की